# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

मुख्य कार्यालय

बँक ऑफ इंडिया इमारत, 3 रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई 400001 (2267 0210 /148 /248,22102222 फॅक्स : 22673915

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 ( 2267 0210 /148 /248, 22102222 Fax : 22673915

माझगांव कार्यालय

विक्रीकर भवन, 9 वा मजला,रुम नंबर 915, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव, मुंबई 400203 (23742191 फॅक्स : 23781061

Vikrikar Bhavan, 9th floor, Room No.915, Sardar Balvantsing Dodhi Marg, Mazgaon, Mumbai 400203 (23742191 Fax : 23781061

ई-मेल sec_mpsc@maharashtra.gov.in, mpscpre@gmail.com वेबसाईट– www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in


## महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा (पूर्व) परीक्षा - २०११

**धारिका क्रमांक : ३७४(१)एक(१)/२०११/तीन**

**जाहिरात क्रमांक : १६५/२०११**

आयोगातर्फे महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा (पूर्व) परीक्षा २०११ **रविवार दिनांक १५ जानेवारी, २०१२** रोजी औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे या चार जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल. प्रस्तुत पदावरील भरतीसाठी उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**२. उपलब्ध पदसंख्या :-**

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ. क्र.** | **पदाचे नाव व एकूण पदसंख्या** | **अराखीव** | **अ.जाती व त्यातील बौध्द धर्मातरित** | **अनुसूचित जमाती** | **वि.जा. (अ)** | **भ.ज. (ब)** | **वि.मा.प्र.** | **भ.ज. (क)** | **भ.ज. (ड)** | **इ.मा.व.** |
| | **जलसंपदा विभाग** | | | | | | | | | |
| १ | सहायक कार्यकारी अभियंता गट-अ (स्थापत्य) (एकूण पदे-२२) | ११ | ३ | २ | १ | १ | १ | १ | -- | २ |
| | महिला | ३ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | खेळाडू | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अपंग | श्रवण शक्तीतील दोष - १ | | | | | | | | |
| २ | सहायक अभियंता, श्रेणी-१, गट-अ (स्थापत्य) (एकूण पदे-५२) | २६ | ७ | ४ | २ | १ | १ | २ | १ | ८ |
| | महिला | ८ | २ | १ | १ | -- | -- | १ | १ | २ |
| | खेळाडू | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | अपंग | श्रवण शक्तीतील दोष – १ चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - १ | | | | | | | | |

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.२ महिलांसाठी व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे सबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.३ महिलांसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग,क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/ का-२, दिनांक २५ मे, २००१ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.४ अपंगासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.५ अपंगासाठी आरक्षित असलेल्या पदावर स्पर्धा परीक्षेद्वारे शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता गुणवत्ता क्रमानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

२.६ अपंग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि त्यांनी तसे आयोगास स्वतंत्ररित्या पत्राने कळविणे आवश्यक आहे.

२.७ खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

३. **वेतनश्रेणी**- ₹ १५,६०० - ३९,१०० + ग्रेड पे ₹ ५,४००/ , एकूण वित्तलब्धी अंदाजित ₹ ४१,३८०/

४. **पात्रतेविषयक अटी** :-

४.१ भारतीय नागरिक.

४.२ वयोमर्यादा - १ मार्च, २०१२ रोजी किमान १९ वर्षे असावे व ३३ वर्षापेक्षा (मागासवर्गाकरिता ३८ वर्षापेक्षा) जास्त नसावे.

४.३ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

४.३.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांकरिता ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील.

४.३.२ पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

४.३.३ माजी सैनिकांसाठी उच्च वयोमर्यादा शासकीय आदेशानुसार शिथिलक्षम राहील.

४.३.४.आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ठ अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिल केली जाईल.

४.३.५ अपंग उमेदवारांसाठी ४५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम राहील.

४.३.६ शैक्षणिक अर्हताः- दोन्ही पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकीमधील पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने पदवीच्या समतुल्य म्हणून मान्य केलेली अर्हता.

४.३.७ मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक

४.३.८ शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांकः डीसीएस -१०८९/२१४८/का. सेवा -३,दिनांक २५ एप्रिल, १९९० व शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक जीटीआय/१०९८/१४५७९/(२३०/९८) ता.शि २, दि.१५ मार्च, १९९९ शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक न्यायप्र-१००५/(३०/०५) तांशि-२, दि.१८ जुलै, २००५ तसेच, इतर प्रचलित शासन निर्णयान्वये समकक्ष अर्हता धारण करीत असलेले उमेदवारही अर्ज करण्यास पात्र ठरतील.

४.३.९ पदवीच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेस बसलेले उमेदवार पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असतील. परंतु ते मुख्य परीक्षेकरीता अर्हताप्राप्त ठरल्यास मुख्य परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत त्यांनी पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

५. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे.अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षा अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" तसेच " **परीक्षा** " या विभागातील महाराष्ट्र अभियांत्रिकी (स्थापत्य) सेवा, गट अ अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन व्हावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

६. प्रस्तुत पदांना शासनाने दिनांक ८ जून, २०१० रोजी निर्गमित केलेली "महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमावली २०१० " लागू आहे.

७. **शुल्क** : **७.१** अमागास - ₹ २६०/- **७.२** मागासवर्गीय - ₹ १३५/- **७.३** सदर शुल्क ऑनलाईन अर्जांची नोंदणी केल्यावर प्राप्त होणा-या विहित चलनाद्वारे भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये कार्यालयीन वेळेत रोखीने भरावे लागेल. **७.४** बँकेमध्ये रक्कम भरल्यानंतर बँकेकडून चलनावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Transaction ID ची नोंद पुन्हा ऑनलाईन पध्दतीने अचूकरीत्या केल्याशिवाय अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होत नाही.

८. **अर्ज करण्याची पद्धत** :-

८.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

८.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक २४ नोव्हेंबर, २०११ ते दिनांक १४ डिसेंबर, २०११** या कालावधित सादर करणे आवश्यक राहील.

८.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

८.४ विहित पद्धतीने दोन्ही टप्प्यांतील अर्ज सादर करण्याची (ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे व परीक्षा शुल्क बँकेत जमा केल्यानंतर Transation ID नोंदविणे) संपूर्णकार्यवाही आयोगाने विहित केलेल्या कालावधीतच पूर्ण करणे आवश्यक आहे.

८.५ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वतःचा अद्ययावत (Latest) फोटो (रुंदी ३.५ से.मी x उंची ४.५ से.मी) व स्वतःचा ईमेलआयडी असणे आवश्यक आहे. तसेच स्वतःची स्वाक्षरी व स्वतःचा फोटो आयोगाच्या सूचनेनुसार विहित पद्धतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

८.६ बॅंकेमध्ये रकमेचा भरणा केल्यावर शासकीय कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसानंतर विहित पध्दतीने Transaction ID अचूकपणे नोंदवावा.

८.७ Transaction ID ची नोंद अचूकपणे केल्यानंतर व नोंदविलेला Transaction ID वैध असल्यास उमेदवाराला संबंधित जिल्हाकेंद्रावरील आयोगाने निश्चित केलेल्या उपकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

८.८ प्रस्तुत परीक्षेच्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर एक सप्ताहामध्ये उमेदवारास प्रवेशप्रमाणपत्राची प्रत त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने डाऊनलोड करुन घेणे आवश्यक आहे.

८.९ परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

९. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १४ डिसेंबर, २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल. चलनाद्वारे विहित शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १५ डिसेंबर, २०११ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे आवश्यक राहील.

१०. चलनाद्वारे शुल्क बँकेमध्ये भरल्यानंतर बँकेकडून प्राप्त होणारा Transaction ID दिनांक १७ डिसेंबर, २०११ रोजी २३.५९ वाजेपर्यंत अचूकपणे नोंदविणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

११. आयोगाने विहित केलेल्या पद्धतीनुसार Transaction ID ची नोंद अचूकरित्या, विहित पद्धतीने व विहित कालावधित न करणाऱ्या उमेदवाराचा अर्ज स्वीकारला जाणार नाही.

मुंबई :
दिनांक : २४ नोव्हेंबर, २०११

**सु.ना.हनुमंते**
उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग